ISSN: 2321-8819 (Online) 2348-7186 (Print) Impact Factor: 1.498 Vol. 5, Issue 5, May 2017

# खानदेशातील धनगर जमातीचे आर्थिक व शैक्षणिक स्थितीचे अध्ययन

महेश एम.बडवे, १
प्रा.जगतराव उत्तम धनगर २
१मू.जे.महाविद्यालय,जळगाव
२ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

**Abstract** :- धनगर जमात ही संपूर्ण भारतात आढळते. महाराष्ट्रात धनगर जमातीची संख्या लक्षणीय आहे. एकेकाळी राज्यकर्ती असलेली ही जमात सध्या मात्र मागासलेले जीवन जगत आहे. धनगर जमातीच्या २४ पोटजाती असून महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये विखुरलेली आहे. खानदेशातील जळगाव,धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यातील धनगर जमातीचे आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास सदर संशोधनात केला आहे. खानदेशात अहिर धनगरांची संख्या जास्त असून त्याखालोखाल ठेल्लारी व हटकर जमात आढळते. गढरी व खुटेकर जमातीची संख्या तुलनेने कमी आहे. धनगर समाज अजूनही मुख्य प्रवाहाच्या सीमेवर रेंगाळतो आहे.

**Keyword** :- . खानदेशातील धनगर, धनगर जमात, अहिर, हटकर, ठेल्लारी,गढरी धनगर.

**१.१ प्रस्तावना:-** धनगर हे महाराष्ट्रातील परंपरागत मेंढपाळ असून मेंढ्याशिवाय शेळया, गायी-म्हशीही पाळतात. पशुधनाच्या बाबतीत सर्वात श्रीमंत असलेला धनगर सध्याच्या धकाधकीच्या व स्पर्धेच्या युगात सुद्धा पूर्वीसारखाच रानावनात भटकताना दिसतो. त्याची आर्थिक व सामाजिक प्रगती झालेली नाही. त्याचप्रमाणे शैक्षणिक प्रगतीच्या अभावाने पिढ्यानपिढ्या वडिलोपार्जित व्यवसाय करताना दिसत आहे. दुसरीकडे जमातीतील थोडकेच लोक मुख्य प्रवाहात आले. त्यांनी शिक्षणातून आर्थिक सामाजिक प्रगती साध्य केली. मात्र त्यांच्याकडून समाजबांधवांच्या उद्धारासाठी कोणत्याही प्रकारचे विशेष योगदान दिलेले आढळत नाही. रुढी परंपरा व जाती व्यवस्थेचा दंश ह्या जमातीला पूर्वीपासूनच झालेला असून त्या विषाची तीव्रता मात्र अजूनही धनगर जमातीतून कमी झालेली दिसत नाही. भाषा, क्षेत्र, चालीरीती, रुढी परंपरा यावरून एकाच जातीच्या अनेक पोटजाती निर्माण झाल्या आहेत. एकीकडे जग जाती धर्माची बंधने तोडू पाहत आहे. धर्मांतर आंतरजातीय विवाह असे सामाजिक परिवर्तन आपण बघत असतो. मात्र धनगर जमातीमध्ये, पोटजातीमध्ये सुद्धा विवाह (बेटी व्यवहार) होतांना दिसत नाही.

महाराष्ट्रात एकुण लोकसंख्येच्या जवळपास ११% इतकी लोकसंख्या असलेला हा समाज राजकारणात मात्र अदखलपात्र समाज किंवा वोटबँक म्हणून विचारात घेतला जातो.विविध समाज संघटनांप्रमाणे धनगर समाज संघटना फारश्या सक्रीय दिसत नाही.तसेच त्यांचा शैक्षणिक विकास झालेला दिसत नाही. व्यावसायिकता व दूरदृष्टीचा अभाव या समाजामध्ये दिसून येतो.

एकेकाळी ऐतिहासिक, सांस्कृतिक परंपरा लाभलेली ही जमात सध्या मात्रे मागासलेले स्वरूप धारण करीत आहे. उज्ज्वल ऐतिहासिक पार्श्वभूमी, मातब्बर लढवय्ये, कर्तबगार स्त्रिया जसे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्यासारखे कन्यारत्न या समाजातून पुढे येऊन आदर्श शासनकर्त्या झाल्या. निरागस व निर्मळ स्वभाव असलेला हा समाज विकासाच्या मुख्य प्रवाहात यावा आणि त्यांचे आर्थिक व सामाजिक अध्ययन करण्याच्या उद्देशाने सदर संशोधन हाती घेतले आहे.

**१.२ मुख्य विषय:** धनगर जात प्रामुख्याने महाराष्ट्रात वास्तव्यास आहे. धनगर या शब्दाचा शब्दशः अर्थ 'जे धनवान आहेत'. धनगर हा शब्द संस्कृत 'धेनु' शब्दापासून तयार झाला आहे. धेनु म्हणजे गाय. गाईच्या शांत स्वभावाप्रमाणे शांत व निरागस स्वभाव वैशिष्ट्ये हे धनगर लोकांचे आहे. त्यांना धनगर, धनगड, धनपाल इ. समान नावाने ओळखतात.[१] 'धांग' म्हणजे पर्वत किंवा पहाड. कष्टाच्या काळात क्षत्रिय लोक त्यांच्या शेळया मेंढ्या घेऊन पर्वतावर जाऊन वास्तव्य करू लागले असे लोक म्हणजे धनगर.[२]

धनगर जमातीचे मूळ स्थान मथुरा जवळील गोकुळ वृंदावन हे असून ते तेथून मेवाड कडे स्थलांतरीत झाले असावे आणि तेथून गुजरात व

ISSN: 2321-8819 (Online) 2348-7186 (Print) Impact Factor: 1.498 Vol. 5, Issue 5, May 2017

महाराष्ट्रात विखुरले असावेत.[३] देवांपैकी कृष्ण हे देखील धनगर होत.[४] कृष्णाचे गोकुळ मधील पालक नंद मेहर राजा हे देखील धनगर जातीचे होते.[५,६] सुरुवातीला धनगरांच्या १२ जाती होत्या. ते सर्व एकाच कुटुंबातील भाऊ होते. श्रमाच्या आधारावर त्यांच्या जाती निर्माण झाल्या. त्यावेळी त्या मुख्य साडे तीन जाती मानल्या जात. हटकर (मेंढपाळ), अहीर (गवळी), किंवा म्हसकर (गुजर), आणि खुटेकर (लोकर व घोंगडी विणणारे) /सनगर यांची अर्धी जात म्हणजे खाटीक (मांस विकणारे) होय.

पशुपालन हा शब्द जीवनाच्या उदरनिर्वाहासाठी लागू होतो. ज्या व्यक्तींचे जीवन केवळ जनावरांवर अवलंबून असते त्यांना पशुपालक म्हणतात.[७] संस्कृत भाषेत धांग या शब्दाचा अर्थ डोंगर असा होतो. काही ठिकाणी असा उल्लेख आढळतो की, डोंगर पर्वतावर राहणारे धनगर तसेच काही ठिकाणी दन या शब्दाचा अर्थ जनावरे असा होतो. यावरून दनागार किंवा दनाकार या शब्दावरून धनगर शब्द अस्तित्वात आला.[८] गुरे-ढोरे, शेळया-मेंढ्या पाळणारा म्हणजे धनगर आजही कोकणात धनगर गायी-म्हशी पाळण्याचा व्यवसाय करतात. यावरून धनगर जातीची उत्पत्ती वर्णातील नसून व्यावसायिक आहे हे सिद्ध होते.[९]

डॉ.प्रभाकर द्राक्षे यांच्या मते, “जगाच्या मध्य पूर्वेकडील भागात व आफ्रिकेत धनगराचा विस्तार आढळतो. भारतात अश्मयुगाच्या उत्तरार्धात म्हणजे इ.स्. पूर्व १५०० च्या आसपास धनगरांची पहिली नोंद मिळते.”[१०] भारतात दक्षिण व उत्तर भारतात देखील धनगरांचे अस्तित्व आहे. तसेच पूर्व पश्चिम भागात ही त्यांचे अस्तित्व आहे. २००९ च्या सार्वत्रिक निवडणूक राजकीय विश्लेषणातून असे स्पष्ट झाले की, भारतात जवळपास ११-१२ कोटी इतकी धनगर जमातीची लोकसंख्या असून त्यांचा राजकीय सहभाग अत्यल्प आहे.[११]

## १.३ संशोधन पद्धती :-

१.३.१ प्रस्तुत संशोधनासाठी पुढील उद्दिष्टे ठरवण्यात आली.

- धनगर जमातीचे आर्थिक स्थितीचे अध्ययन करणे.
- धनगर जमातीचे शैक्षणिक स्थितीचे अध्ययन करणे.

१.३.२ प्रस्तुत संशोधनासाठी पुढील गृहीतके ठरवण्यात आली.

- खानदेशातील धनगर जमात आर्थिकदृष्ट्या मागास आहे.
- धनगर जमात शैक्षणिक विकासात मागासलेली आहे.

प्रस्तुत संशोधनामध्ये खानदेशातील धनगर जमातीचे आर्थिक व सामाजिक अध्ययन केलेले असून त्यात प्रामुख्याने धनगर जमातीची आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक प्रगतीवर झालेला परिणामांचा अभ्यास केलेला आहे. या करिता संशोधकाने हा अभ्यास दोन पद्धतींनी केलेला असून त्याकरिता पुढील संशोधन पद्धतीचा अवलंब केलेला आहे.

अ. स्थूल पातळीवरील विश्लेषण:-

आ. सूक्ष्म पातळीवरील विश्लेषण:-

### अ. स्थूल पातळीवरील विश्लेषण:-

यात अखिल भारतीय पातळी, महाराष्ट्र राज्य व खानदेश विभाग यांचा समावेश होतो. यासाठी दुय्यम साधन सामग्रीचा आधार घेतला असून दुय्यम आकडेवारी करिता जनगणना अहवाल, जिल्हा आर्थिक सामाजिक समालोचन, महाराष्ट्राचा आर्थिक सर्वेक्षण अहवाल, राष्ट्रीय पातळीवरील प्रकाशित होणारी साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, त्रैमासिके, शासकीय योजनांचे अहवाल, विविध अभ्यासकांचे अप्रकाशित प्रबंध, विमुक्त जाती व भटक्या जमातीबद्दल बिगर सरकारी संस्थांचे अहवाल, विविध नियतकालिके, संदर्भग्रंथ, दैनिक वृत्तपत्रे, संकेतस्थळे इत्यादींचा आधार घेण्यात आला.

### आ.सूक्ष्म पातळीवरील विश्लेषण:-

या पद्धतीमध्ये नमुना निवडलेल्या मुलाखत दात्यांची माहिती प्राथमिक आकडेवारीवर आधारलेली असून प्राथमिक आकडेवारी गोळा करण्यासाठी मुलाखत अनुसुचीचा वापर केलेला आहे. अध्ययन क्षेत्र असलेला खानदेश विभाग हा जळगाव, धुळे व नंदुरबार या तीन जिल्ह्यात विभागलेला असून प्रत्येक जिल्ह्याची आर्थिक, सामाजिक, नैसर्गिक, भौगोलिक, कृषीविषयक परिस्थिती वेगवेगळी आहे म्हणून अध्ययनात प्रत्येक जिल्ह्याचा स्वतंत्र व संपूर्ण खानदेश असा अभ्यास केलेला असून प्राथमिक आकडेवारी गोळा करण्यासाठी त्रिस्तरीय स्वैर नमुना

निवड पद्धतीचा वापर केलेला आहे. त्यात तालुका पहिला एकक, गावं दुसरा एकक, तर निवडलेला मुलाखतदाता हा अंतिम एकक आहे.

सर्वप्रथम खानदेशातील तिन्ही (३) जिल्ह्यातील प्रत्येकी दोन (२) तालुक्यांची निवड केली. ह्या निवडलेल्या एकूण सहा (६) तालुक्यातून प्रत्येकी पाच (५) गावांची निवड केली. शेवटी निवडलेल्या (तीस) (३०) प्रत्येक गावातून धनगर जमातीतील दहा मुलाखतदाते ह्याप्रमाणे एकूण तीनशे (३००) मुलाखत दात्यांची निवड केली. खानदेशातील तीनही जिल्ह्यातील प्रत्येकी दोन तालुके निवडताना साधारणतः धनगर जमातीची अधिक लोकसंख्या असलेली तालुक्यांची निवड केली तोच निकष गावांच्या निवडीबाबत लागू केला.

**१.४ खानदेशातील धनगर जमात :-** खानदेशातील पाहणी केलेल्या संशोधन क्षेत्रातील धनगर जमातीच्या उपजातींची संख्या पुढील तक्त्यावरून स्पष्ट करता येईल.

तक्ता क्र.१ **खानदेशातील संशोधन क्षेत्रातील उपजातींची संख्या**

| उपजाती | जळगाव | धुळे | नंदुरबार | एकूण |
|---|---|---|---|---|
| अहिर | 80(80%) | 96(96%) | 64(64%) | 240(80%) |
| हटकर | 10 (10%) | 0 | 10 (10%) | 20 (6.66%) |
| ठेल्लारी | 0 | 4(4%) | 26(26%) | 30(10%) |
| गढरी | 10 (10%) | 0 | 0 | 10(3.33%) |
| **एकूण** | 100(100%) | 100(100%) | 100(100%) | 300(100%) |

स्त्रोत प्रत्यक्ष पाहणी

तक्ता क्र.१मध्ये खानदेशात संशोधन क्षेत्रातील अहिर धनगरांचे प्रमाण सर्वात जास्त (८०%)असून त्या खालोखाल ठेल्लारी धनगर (१०%) आहेत.त्यानंतर हटकर व गढरी धनगर आहेत. जळगाव, धुळे व नंदुरबार या तिन्ही जिल्ह्यात अहिर धनगर जास्त आढळले.

तक्ता क्र.२ **खानदेशातील संशोधन क्षेत्रातील मुलाखत दात्यांचे उत्पन्न**

| | | उत्पन्न | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | जिल्हे | १ ते ५० हजार | ५१ हजार ते १ लाख | १००००१ ते २ लाख | २००००१ ते ४ लाख | ४००००१ ते ६ लाख | ६००००१ ते १० लाख | १० लाखावरील | Total |
| 1 | जळगाव | 14 | 20 | 34 | 19 | 8 | 5 | 0 | 100(100%) |
| 2 | धुळे | 18 | 24 | 32 | 11 | 8 | 3 | 4 | 100(100%) |
| 3 | नंदुरबार | 8 | 27 | 25 | 22 | 10 | 2 | 6 | 100(100%) |
| | एकूण | 40(13.33%) | 71(23.66%) | 91(30.33%) | 52(17.33%) | 26(8.66%) | 10(3.33%) | 10(3.33%) | 300(100%) |

स्त्रोत प्रत्यक्ष पाहणी

तक्ता क्र.२ मध्ये खानदेशात संशोधन क्षेत्रातील कुटुंब प्रमुखांचे उत्पन्न अभ्यासले असता २ लाखाच्या आत उत्पन्न असणारे एकूण २०२ (६७.३३%) कुटुंब आढळले. याचा अर्थ खानदेशातील धनगर समाज अजूनही आर्थिकदृष्ट्या मागास आहे.

तक्ता क्र. ३ **खानदेशातील संशोधन क्षेत्रातील मुलाखत दात्यांचे शिक्षण**

| | | शिक्षण | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | जिल्हे | निरक्षर | प्राथमिक | माध्यमिक | उच्च माध्य | पदवी | पदव्युत्तर | एकूण |
| 1 | जळगाव | 24 | 14 | 40 | 17 | 2 | 3 | 100(100%) |
| 2 | धुळे | 30 | 14 | 40 | 11 | 2 | 3 | 100(100%) |
| 3 | नंदुरबार | 37 | 11 | 29 | 13 | 4 | 6 | 100(100%) |
| | एकूण | 91(30.33%) | 39(13%) | 109(36.33%) | 41(13.66%) | 8(2.66%) | 12(4%) | 300(100%) |

स्त्रोत प्रत्यक्ष पाहणी

ISSN: 2321-8819 (Online) 2348-7186 (Print) Impact Factor: 1.498 Vol. 5, Issue 5, May 2017

तक्ता क्र.३मध्ये खानदेशात संशोधन क्षेत्रातील कुटुंब प्रमुखांचे शिक्षणाच्या बाबतीत अभ्यास केला असता (३०.३३ %) कुटुंब प्रमुख निरक्षर आढळले.तर केवळ ४% कुटंब प्रमुख पदव्युत्तर शिक्षण घेतेलेले आहेत. यावरून हे सिध्द होते की, खानदेशातील धनगर जमातीत अजूनही शिक्षणाचे प्रमाण कमी आहे.

तक्ता क्र. ४ **खानदेशातील संशोधन क्षेत्रातील मुलाखत दात्यांच्या कुटुंबातील स्त्री-पुरुष साक्षरता**

| | | पुरुष | | स्त्रिया | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | जिल्हे | साक्षर | निरक्षर | साक्षर | निरक्षर | एकूण |
| 1 | जळगाव | 256 | 27 | 213 | 45 | 541(31.14%) |
| 2 | धुळे | 255 | 40 | 192 | 89 | 576 (33.16%) |
| 3 | नंदुरबार | 221 | 84 | 164 | 151 | 620 (35.69%) |
| | एकूण | 732(42.14%) | 151 (8.69%) | 569 (32.75%) | 285 (16.40%) | 1737 (100%) |

स्त्रोत प्रत्यक्ष पाहणी

तक्ता क्र.४ मध्ये खानदेशात संशोधन क्षेत्रातील धनगर जमातीत पुरुषांच्या तुलनेने स्त्रियांचे निरक्षरतेचे प्रमाण अधिक आहे. स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण ३२.७५% असून पुरुषांचे साक्षरतेचे प्रमाण ४२.१४% आहे.अजूनही धनगर समाज स्त्रियांच्या शिक्षणाबाबत उदासीन असल्याचे दिसते.

**१.५ निष्कर्ष-**

वरील संशोधनात काही प्रमुख निष्कर्ष पुढीलप्रमाणे-

१. खानदेशात संशोधन क्षेत्रातील अहिर धनगरांचे प्रमाण सर्वात जास्त (८०%) आहे.

२. जळगाव, धुळे व नंदुरबार या तिन्ही जिल्ह्यात अहिर धनगर जास्त आढळले.

३. खानदेशात संशोधन क्षेत्रातील कुटुंब प्रमुखांचे उत्पन्न अभ्यासले असता २ लाखाच्या आत उत्पन्न असणारे एकूण २०२ (६७.३३%) कुटुंब आढळले.

४. खानदेशातील धनगर समाज अजूनही आर्थिकदृष्ट्या मागास आहे.

५. खानदेशातील (३०.३३ %) धनगर कुटुंब प्रमुख निरक्षर आढळले.तर केवळ ४% कुटंब प्रमुख पदव्युत्तर शिक्षण घेतेलेले आहेत. यावरून हे सिध्द होते की, खानदेशातील धनगर जमातीत अजूनही शिक्षणाचे प्रमाण कमी आहे.

६. खानदेशातील धनगर जमातीत अजूनही शिक्षणाचे प्रमाण कमी आहे.

७. धनगर जमातीत पुरुषांच्या तुलनेने स्त्रियांचे निरक्षरतेचे प्रमाण अधिक आहे. स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण ३२.७५% असून पुरुषांचे साक्षरतेचे प्रमाण ४२.१४% आहे.

८. अजूनही धनगर समाज स्त्रियांच्या शिक्षणाबाबत उदासीन असल्याचे दिसते.

**१.६ सारांश-**

खानदेशातील धनगर जमातीत अजूनही शिक्षणाचे प्रमाण कमी असून त्यात मुलींच्या शिक्षणाबाबत धनगर समाज उदासीन असल्याचे दिसते. मुलगी परक्याचे धन ही प्रवृत्ती धनगर समाजात आजही आहे. मुलीना केवळ १०वी, १२ वी पर्यंत शिकवावे अशी धारणा आजही ग्रामीण भागात आहे. बदलत्या काळात धनगर समाज मुख्य प्रवाहापासून दूर पडत आहे. ग्रामीण धनगर समाजात शिक्षणाचे प्रमाण वाढल्यास त्यांना येणाऱ्या अडचणी निश्चित कमी होतील आणि त्यांच्या आर्थिक सामाजिक विकासास हातभार लागेल.

**१.७ संदर्भसूची-**


१. Dr. Sakasena R.N. Dhangars and Dadariyas, The most Bachword divisions of Indian Tribes and Casts, Research Paper.

२. गणपतराव कोळेकर, धनगर समाज प्राचीन इतिहास व कुळगोत्र १९९२ (मराठी)

३. Russel R.V., Rosalind, The Tribes and Casts of the Central Provinces of India, Macmilan and Co. London, 1916, Vol II, Pp. 118

४. Dr.D.D.Kasambi, Myth and Reality: Studies in the formation of Indian Culture Popular Publications, Mumbai, 1962 p.28.

५. Bombay Gazetter, Vol.IX, Part I, P. 267-285.

६. Russel R.V., Rosalind, The Tribes and Casts of the Central Provinces of India, Macmilan and Co. London, 1916, Vol II, Pp. 118.

७. दळणर शिवाजी विठ्ठलराव,'परभणी जिल्ह्यातील धनगर समाजाचा आर्थिक सामाजिक स्थितीचा अभ्यास',अप्रकाशित प्रबंध, पीएच.डी.,२००३ डॉ.बा.आ.म.वि.औरंगाबाद, पृ.१३.

८. उपरोक्त पृ.२०

९. उपरोक्त

१०. दळणर शिवाजी विठ्ठलराव,'परभणी जिल्ह्यातील धनगर समाजाचा आर्थिक सामाजिक स्थितीचा अभ्यास',अप्रकाशित प्रबंध, पीएच.डी.,२००३ डॉ.बा.आ.म.वि.औरंगाबाद, पृ.२० वरून उधृत.

११. महादेव जानकर यांच्या ब्लॉग वरून संकेतस्थळ.